# महाराष्ट्र शासन
# ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, सोलापूर.
# दरपत्रक निविदा सुचना सन २०२५-२०२६

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद. सोलापूर दूरध्वनी क्रमांक ०२१७ - २७२६८६४ हे, १२ वा वित्त आयोग (शिल्लक व व्याजाची रक्कम) अंतर्गत **मौजे बोरोटी ता.अक्कलकोट** येथिल पाणी पुरवठा योजनेवर सौर यंत्रणा उभारणी करण्यासाठी अशा प्रकारच्या कामाचा अनुभव असणा-या जिल्हा परिषदेकडील नोदणीकृत विद्युत / यांत्रिकी ठेकेदार यांचेकडुन दोन लिफाफा पध्दतीने जाहिर निविदा मागवित आहेत.

उपरोक्त कामा बाबत निविदा, अटी व शर्ती इ. बाबतचा सर्व तपशिल निविदा संचामध्ये नमुद केलेला असून को-या निविदासंच http:www.zpsolapur.gov.in या संकेत स्थळावर ऑनलाईन पहावयास मिळेल.

दिनांक. ०५/०३/२०२६ रोजी दुपारी ०२.०० वाजले पासून डाऊनलोड करुन परिपुर्णरित्या भरलेल्या जाहिर निविदा दिनांक. १२ / ०३ /२०२६ रोजी सकाळी १२.०० वाजे पर्यंत वा त्यापुर्वी स्विकारण्यात येतील.

जाहिर निविदा दिनांक. १२/०३ /२०२६ रोजी दुपारी १३.०० नंतर उघण्यात येतील.

| अ.क्र. | कामाचेनांव | अंदाजित रक्कम रुपये | बयाणा रक्कम रुपये | कामाची मुदत | को-या निविदा किंमत | ठेकेदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | मौजे बोरोटी, ता. अक्कलकोट येथिल पाणी पुरवठा योजनेवर १२ किलोवॅट क्षमतेची सौर यंत्रणा उभारणी करणे | ९९९०४८.०० | ९९००.०० | १५ दिवस | ५००.०० | अशा प्रकारच्या कामाचा अनुभव असणा-या जिल्हा परिषदेकडील नोदणीकृत विद्युत / यांत्रिकी ठेकेदार |

**१.** उपरोक्त तक्त्यातील कामाचे नावा समोर रकाना क्रं. ४ व ६ मध्ये नमुद केलेल्या बयाणा व निविदा फी रक्कम स्टेट बॅक ऑफ इंडिया या बॅकेत चलनाद्वारे भरण्यात यावी.

**२.** निविदेच्या अटी शर्ती मध्ये बदल करणे, प्राप्त निविदा पैकी, एक किंवा सर्व निविदा कोणते ही कारण न देता नाकारणेचा हक्क निम्न स्वाक्षरीत यांनी राखून ठेवला आहे.

**-स्वाक्षरीत-**
**उपअभियंता(यांत्रिकी)**
**यांत्रिकी उपविभाग,**
**जिल्हापरिषद,सोलापुर**

**-स्वाक्षरीत-**
**कार्यकारी अभियंता**
**ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,**
**जिल्हा परिषद, सोलापुर**

# सविस्तर निविदा सुचना
# जाहिर निविदा सुचना २०२५-२०२६

मक्तेदारांनी निविदा खालील प्रमाणे दोन लिफाफा (Two Envelope) जाहिर निविदा सादर करणे आवश्यक आहे.

**(अ) तांत्रिक लिफाफा(लिफाफा क्रं.१)**

१. कोरी निविदा फी व बयाना रक्कम भरणा केलेल्या चलनाची प्रत निविदे सोबत जोडणे.

२.जिल्हा परिषदेकडील नोदणीकृत विद्युत/यांत्रिकी ठेकेदार असलेबाबत नोंदणी प्रमाणपत्राची प्रत.

३.मागील 3 वर्षाचे आयकर भरलेले प्रमाणपत्र स्कॅन केलेली प्रत अपलोड करावी. (सन २०२२-२३, २०२३-२४ व २०२४-२५ या आर्थिक वर्षातील )

४.पॅन कार्डची स्कॅन केलेली प्रत निविदे सोबत जोडणे.

५.जी.एस.टी. नोंदणी प्रमाणपत्राची स्कॅन केलेली प्रत निविदे सोबत जोडणे.

६. नोदणीकृत ठेकेदाराचे शासकीय / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्था अथवा अन्य कोणत्याही शासकीय विभागा अंतर्गत INSTALLATION OF ON GRID SOLAR SYSTEM / या कामाचे एकुण कमीत कमी १० किलोवॅट क्षमतेचे काम वेळेत व यशस्वीरित्या पुर्ण केलेबाबत अनुभव प्रमाणपत्र (Work Done certificate ) सक्षम प्राधिकारी यांचे स्वाक्षरीने निविदे सोबत जोडणे.

७. मक्तेदाराचे निविदेत सादर केलेली माहीती सत्य व खरी आहे. तसेच माझे फर्म महाराष्ट्र राज्याच्या कोणत्याही शासकीय विभाग / जिल्हा परिषदच्या कामामध्ये काळया यादीत समाविष्ठ नसले बाबत स्वयं प्रतिज्ञापत्र करुन निविदे सोबत जोडणे.

८. रक्कम रुपये ५०० च्या स्टॅम्प पेपेरवर मागील तीन वर्षात सरासरी किमान र.रु. १० लक्ष अर्थिक उलाढाल असलेबाबत C.A. चे UDIN नंबरसह प्रमाणपत्र जोडणे.

**(ब)आर्थिक लिफाफा (लिफाफा क्रं. २)**

मक्तेदारानी आपले दर विहीत आर्थिक लिफाफ्यामध्ये योग्य त्या जागी भरुन निविदेसोबत सादर करावे. प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रित्या निविदेचे दर इतर कुठेही नमुद करणेत येऊ नये.

## निविदेच्या इतर अटी व शर्ती :

**१.** निविदेच्या किंमतीत अंदाजपत्रकानुसार साहित्य सर्व करांसहित पुरवठा करणे, उभारणी करणे, वाहतुक, पॅकींग व साहित्य गाडीत भरणे, उतरविणे, कार्यान्वित करणे, टेस्ट व ट्रायल देणे इत्यादीचा समावेश असेल.

**२.** पुरवठा करण्यात येणारे सर्व साहित्य निविदेतील तांत्रिक निकषानुसार पुरवठा करावयाचे आहे. निविदेतील तांत्रिक निकषानुसार साहित्य नसल्यास ते स्विकारले जाणार नाही.

**३.** सदर कामाचा दोषदायीत्व कालावधी व दुरूस्ती देखभाल दायित्व करीता कालावधी (CMC) ५ वर्षे निश्चित केलेला आहे. पुरवठादारांने पुरवठा करावयाची साहित्य हे दर्जेदार व निकषानुसार योग्य तांत्रिक तपशिलानुसारच पुरवठा करावयाचे आहे.

**४.** मक्तेदाराने वापरण्यात येणा-या साहित्याचे (सौर पॅनल व तदनुषंगीक साहित्य हे MNRE ने Aprooved केलेल्या उत्पादकाचे वापरणे बंधनकारक राहिल. त्याच्या पृष्ठ्यर्थ MNRE चे टेस्ट रिपोर्ट सादर करणे आवश्यक राहील.

**५.** शासन परिपत्रक दि. १७/०९/२०१९ तसेच शा. दि. ११/०५/२०२० अन्वये निविदेमध्ये Bid Capacity ची अट समाविष्ट करण्याच्या सुचना दिलेल्या आहेत. तथापी एकाच कंत्राटदाराने एका वित्तीय वर्षात तीन किंवा त्यापेक्षा जास्त कामे घेतली असल्यास त्याच्यासाठी त्या वित्तीय वर्षात पुढील निविदांसाठी Bid Capacity ची शर्त लागू राहील. याबाबत खातरजमा करण्यासाठी लिफाफा क्रं. **१** मध्ये चालू वित्तीय वर्षात हमी घेतलेल्या सर्व कामांची निविदा विषयक माहिती / सी.ए.प्रमाणपत्र सादर करावे.

**६.** शा. नि. २६/११/२०१८ अन्वये निविदेचा तांत्रिक व आर्थिक लिफाफा क्रं. १ व २ उघडल्यानंतर प्रथम न्युनतम वेतन सादर करण्याचा L१ निविदाकाराने Additional Performance Security deposit आठ दिवसाच्या आत D.D. व्दारे जमा करावा

निविदेचा देकर

१. १०% कमी दरापर्यंत - १%

२. १५% कमी दरापर्यंत (१५% - १०%) = ५%

३. तसेच १५% पेक्षा कमी देकार असलेतर

उदा. १९%. कमी दरासाठी

१०% पर्यंत - १%

१५% पर्यंत - ५%

१९% साठी (१९ - १५) = ४% करीता (४*२) = ८%

असे एकुण ( १+५+८) =१४%

अशा प्रकारे Additional performance Security Deposite परिगणीत करुन ८ दिवसाचे आत D.D. व्दारे जमा करावा.

यामध्ये कोणतीही सवलत तथा मूदतवाढ देण्यात येणार नाही.

**७.** आवश्यक कागदपत्रे / प्रमाणपत्रे सादर करण्यास तांत्रिक अडचणी असल्यास त्याबाबत निविदा स्विकारणे अथवा नाकारणे बाबत अंतीम निर्णय मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. सोलापूर यांचा राहिल.

**८.** निविदा / दर मंजुरी झाल्याचे कळविले नंतर निविदा प्रकियेतील कमीत कमी मंजुर दरानुसार कामे करण्यास / पुरवठा करण्यास तयार असल्याचे संमतीपत्र, शासन निर्णयानुसार विहीत किंमतीच्या स्टँम्प पेपरवर साहित्य पुरवठा तथा अनुषंगीक कामे करण्यास तयार असल्या बाबतचा करारनामा करुन ०७ दिवसाच्या आत उपअभियंता (यां), यांत्रिकी उपविभाग यांचे कार्यालयात दयावा लागेल.

**९.** सदर कामाचे कार्यारंभ आदेश देण्यापुर्वी संबंधीत पुरवठादाराने ०१ टक्के सुरक्षा अनामत रक्कम जिल्हा परिषद सोलापुर यांच्याकडे काम पुर्ण होईल त्या कालावधी पर्यंत जमा करणे बंधनकारक आहे. सर्व कामे पुर्ण केल्यावर सदरची सुरक्षा अनामत रक्कम ठेकेदारांस परत करण्यात येईल. ठेकेदारास त्या सुरक्षा अनामत रक्कमेवर कोणतेही व्याज मिळणार नाही.

**१०.** निविदेच्या वेळी भरणा केलेली बयाना रक्कम सदर कामाचे कार्यारंभ आदेशात दिलेली कामे पुर्ण केल्या नंतर परत करण्याचे कार्यवाही करण्यात येईल.

**११.** सदर काम करताना कोणतीही हानी झाल्यास/ अपघात झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

**१२.** अंदाजपत्रकातील साहित्याची तांत्रिक तपासणी उपअभियंता (यां), यांत्रिकी उपविभाग, जिल्हा परिषद सोलापूर यांच्या कार्यालयाकडून करुन घेतल्या शिवाय योजनेच्या स्थळी साहित्य आस्थापित करण्यात येवू नये.

**१३.** कामाची मुदत :

अ) पुरवठा आदेश मिळाले पासुन १५ दिवसांमध्ये काम पुर्ण करणे बंधनकारक आहे.

ब) जर कंत्राटदाराने विहीत मुदतीत आदेशित काम पुर्ण केले नाही तर किंवा विलंबाचा संयुक्तीक खुलासा न केल्यास जिल्हा परिषद, सोलापुरकडील विहीत दंड आकारला जाईल.

क) तर्कसंगत/ वास्तववादी कारण असल्यास/ स्थानिक अडचणी असल्यास कामाचा कालावधी वाढवुन देता येईल. मात्र कंत्राटदार काम करण्यास असमर्थ ठरल्यास अथवा कंत्राटदाराने आदेशित केलेल्या कामापैकी काही साहित्य अस्विकृत झाले असल्यास असे अस्विकृत साहित्य मुदतीत बदलून दिले नाहि तर काम देणारी यंत्रणा त्यांना योग्य वाटेल अशा कोणत्याही पुरवठादाराकडून मंजुर दराने उर्वरीत साहित्य खरेदी करण्यास सक्षम राहतील व कसूरदार पुरवठादार / कंत्राटदारांची जिल्हास्तरावरील सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

**१४.** सदर कामाचे देयक अदायगी करणेपुर्वी पुरवठारांनी सुरक्षा अनामत रक्कम अंदाजपत्रकीय रक्कमेच्या ३ टक्के रक्कमेची राष्ट्रीयकृत बँकेचे बँक गॅरेंटी FDR / TDR प्रमाणपत्र दोषदायीत्व कालावधी संपेपर्यंत (५ वर्षे) सुरक्षा अनामत रक्कम म्हणुन उपअभियंता (यां), यांत्रिकी उपविभाग, जिल्हा परिषद सोलापूर यांच्या कार्यालयात जमा करण्यात यावी. त्यानंतर देयकाची १०० टक्के अदायगी करण्यात येईल.

**१५.** देयकातुन आयकर, जी.एस.टी, जि.प सेस, आणि जि.आय.एस. व इतर सर्व करांची शासकीय नियमानुसार वजावट करुन देयक अदा करण्यात येईल.

**१६.** मक्तेदार यांनी सादर केलेले निविदेतील दर, लिफाफा क्र. ०२ उघडले नंतर १२० दिवसापर्यंत वैध राहतील.

**१७.** निविदेतील सर्व वा कोणतीही अटी व शर्तीपुर्ण न करणाऱ्या मक्तेदाराच्या निविदा व अर्धवट सादर केलेल्या निविदा अपात्र समजल्या जातील.

**१८.**कोणत्याही अटीवर आधरित (Conditional) निविदा स्विकारल्या जाणार नाहीत अथवा मंजुर केल्या जाणार नाहीत.

**१९.** निविदेच्या अटी व शर्ती मध्ये बदल करणे, प्राप्त निविदा पैकी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारणेचा हक्क निम्न स्वाक्षरीत यांनी राखून ठेवला आहे.

**२०.** संक्षिप्त निविदा सुचना व सविस्तर सुचना निविदा तंत्राचा एक भाग राहील.

कोणत्याही बाबी साठी काही तंटा निर्माण झाल्यास त्याबाबत सोलापुर जिल्हा न्यायालय कार्यक्षेत्र राहील.

**-स्वाक्षरीत-**
**उपअभियंता(यांत्रिकी)**
**यांत्रिकी उपविभाग,**
**जिल्हापरिषद,सोलापुर**

**-स्वाक्षरीत-**
**कार्यकारी अभियंता**
**ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,**
**जिल्हा परिषद, सोलापुर**